चलो दाभाडी !                                                                 चलो दाभाडी !

# युवक क्रांती दल-लोकसमिती व भारतीय रिपब्लीकन पक्ष यांचे सयुक्त

# – शेतकरी – भूमिहीनांची जाहीर सभा –

– गायरान, जंगल, इनाम जमिनी नावावर झाल्याच पाहिजेत –

## सोमवार दि. १६ नोव्हेंबर ९२ वेळ दुपारी १२ वाजता

प्रिय कष्टकरी बहिणी-भावांनो, क्रांतीकारक अभिवादन

मागील अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात भूमिहीनांची चळवळ चालु आहे. वहीतीखालील सरकारी गायरान, जंगल पडीक, इनामवतन जमीनी भूमिहीन स्री – पुरूषांच्या नावे कराव्यात ही मागणी करीत आहोत. भूमिहीन हक्क संरक्षण समितीचे नेते खासदार बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा लढा चालू आहे. गेल्यावर्षी महाराष्ट्र सरकारने सरकारी पडीक व गायराण जमीणी नवरा बायकोच्या नांवावर करण्याचा 'जीआर' काढला परतू अजून जालना जिल्ह्यात याची चांगली अंमलबजावणी झालेली नाही. अनेक अतिक्रमणकांची नावे तहसिलयादीत नाहीत काही गायराण जमिनीत वनीकरण करण्यात आले आहे. काही गावातील गुंड व जातीयवादी आपली पीके चारत आहेत या गुंडांविरूद्ध तक्रार करूनही पोलीस काहीच कारवाई करीत नाहीत. ज्यांना प्रमाणपत्र (सनद) मिळाले त्याना कमी जमीन मिळाली आहे. जमीन मिळाल्या-नंतरही बैलबारदाना, पाणी, बि–बियाणे कुटून आणणार हा प्रश्नच आहे

या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी युवक क्रांती दल व लोकसमितीच्या वतीने सोमवार दि. १६–११–९२ रोजी दुपारी १२ वाजता दाभाडी ता, जि. जालना येथे शेतकरी व भूमिहीन शेतमजुरांची जाहिर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला गायरान – जंगल जमिनी कसणाऱ्या सर्व अतिक्रामक स्री- पुरूषांनी व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**या सभेत महाराष्ट्र युवक क्रांती दलाचे कार्यवाह आयु. शांताराम पंदेरे, औरंगाबाद व प्रा. अविनाश डोळस (भारिप औरंगाबाद) राज्य कार्यकारिणी सदस्य आयु. उत्तम आव्हाड (पाल) आयु. गंगाधर त्रिभुवन (वैजापूर) आयु. समिंदराबाई दनके (बावरा) आयु. लक्ष्मण भालेराव, आळंद, आयु. कै. एस. उमके गुरूजी पिरबावडा, आयु. धोंडिराम साठे, जळगांव मेटे यांची भाषणे होणार आहेत.**

– आपले विनीत –

सर्जेराव कांबळे     बाजीराव मगरे     छबु दगडू (दाभाडी)     केसरबाई बाजीराव मगरे
मंडाबाई गंगाराम (दाभाडी)     चंद्रभागाबाई कांबळे     कचरु बळवंता रगडे
सुखदेव तांबे  दगडू साळवे (पिंपळगांव सुतार)  धोंडीबा रगडे (भारिप)  चंपाबाई साळवे चिखली

## युवक क्रांती दल। लोकसमिती जालना जिल्हा